जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 OCT 2017
महाराष्ट्र टाईम्स

# 'बालहक्कांकडे मानवी दृष्टिकोनातून पहा'

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

'बालहक्कांच्या प्रश्नांकडे मानवतेच्या दृष्टीकोनातून पाहणे आवश्यक आहे. त्यांचे प्रश्न, गरोदर मातांचे प्रश्न, आहार यासह अनेक गोष्टींवर विशेष लक्ष केंद्रीत करण्यासाठी माध्यमांनीही सकारात्मक दृष्टीकोन स्वीकारला तर शाश्वत विकासाची उद्दीष्ट गाठणे शक्य होणार आहे,' असे प्रतिपादन पुणे येथील एमआयटीचे अधिष्ठाता डॉ. सुधीर गव्हाणे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभाग तसेच एम. ए. मास कम्युनिकेशन आणि युनिसेफ यांच्या संयुक्तविद्यमाने 'शाश्वत विकासाच्या उद्दीष्टांचे मॉडेल' या विषयावर आयोजित राज्यस्तरीय कार्यशाळेत ते बोलत होते. युनिसेफच्या महाराष्ट्रच्या प्रमुख संवादतज्ज्ञ स्वाती महापात्रा यांची यावेळी विशेष उपस्थिती होती.

स्वाती महापात्रा म्हणाल्या, 'शाश्वत विकासाचे अनेक निकष आहेत. त्यामध्ये बालकांचा विकास, त्यांचे हक्क आणि अधिकार याला विशेष महत्व आहे. जागतिक पातळीवर याविषयी काम सुरु आहे. माध्यमांनी या अत्यंत जिव्हाळ्याच्या विषयाकडे सकात्मक दृष्टीने पाहिले तर चित्र बदलू शकेल.'



सुधीर गव्हाणे

प्रारंभी ज्येष्ठ पत्रकार अरुण साधू यांना आदरांजली वाहण्यात आली. पाहुण्यांचे स्वागत विभागप्रमुख डॉ. निशा मुडे-पवार यांनी केले. युनिसेफचे संशोधक डॉ. मनिंदरसिंग सेठिया यांनी शावत विकासाच्या उद्दीष्ट्यांच मॉडेलचे सविस्तर सादरीकरण केले. औरंगाबाद येथील रफिक झकेरिया सेंटरचे प्रमुख डॉ. शाहीद शेख, सोलापूर विद्यापीठाच्या पत्रकारिता विभागाचे प्रमुख डॉ. रवींद्र चिंचोलकर, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ पत्रकारिता विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. दिपक शिंदे, पुणे विद्यापीठ पत्रकारिता विभागाचे प्रमुख डॉ. संजय तांबट, प्रमुख डॉ. माधवी रेड्डी, संवादतज्ज्ञ तानाजी पाटील, माजी विभागप्रमुख डॉ. रत्नाकर पंडित आदी कार्यशाळेत सहभागी झाले.

14 OCT 2017

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बालहक्कांकडे मानवतेच्या दृष्टिकोनातून पाहा

## प्रा. सुधीर गव्हाणे : शिवाजी विद्यापीठ येथे राज्यस्तरीय कार्यशाळा उत्साहात

प्रतिनिधी

कोल्हापूर

भारतात शाश्वत विकासाची उद्दीष्टे पूर्णत्वाला आणणे आवश्यक आहे. आरोग्यासारख्या अत्यंत संवेदनशील विषयात आपण जगाच्या खूप मागे आहोत. बालकांचे प्रश्न, गरोदर मातांचे प्रश्न, आहार यासह अनेक गोष्टींवर विशेष लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन पुण्यातील एमआयटीचे अधिष्ठाता डॉ. सुधीर गव्हाणे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभाग, एम. ए. मास कम्युनिकेशन आणि युनिसेफ यांच्या संयुक्त विद्यमाने 'शाश्वत विकासाच्या उद्दीष्टांचे मोड्यूल' या विषयावर आयोजित राज्यस्तरीय कार्यशाळेत ते बोलत होते.

डॉ. सुधीर गव्हाणे म्हणाले, पत्रकारितेचे प्राध्यापक, विद्यार्थी आणि माध्यमे यांनी बालहक्काकडे प्रामुख्याने लक्ष देण्याची गरज आहे. स्वाती मोहपात्रा म्हणाल्या, शाश्वत विकासाचे अनेक निकष आहेत. त्यामध्ये बालकांचा विकास, त्यांचे हक्क आणि अधिकार याला विशेष महत्व आहे. जागतिक पातळीवर याविषयी काम सुरु आहे. माध्यमांनी या अत्यंत जिव्हाळ्याच्या विषयाकडे सकात्मक दृष्टीने पाहिले तर चित्र बदलू शकेल. युनिसेफचे संशोधक डॉ. मनिंदरसिंग सेठिया यांनी शाश्वत विकासाच्या उद्दीष्टांच्या मोड्यूलचे सविस्तर सादरीकरण केले.



पाहुण्यांचे स्वागत विभागप्रमुख डॉ. निशा मुडे-पवार यांनी केले. यावेळी औरंगाबाद येथील रफिक झकेरिया सेंटरचे प्रमुख डॉ. शाहीद शेख, सोलापूर विद्यापीठाच्या पत्रकारिता विभागप्रमुख डॉ. रवींद्र चिंचोलकर, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ पत्रकारिता विभाग प्रमुख प्रा. डॉ. दिपक शिंदे, जळगाव येथील उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ पत्रकारिता विभागप्रमुख डॉ. टी. व्ही. दौड, मुंबईच्या एसएनडीटी विद्यापीठ पत्रकारिता विभागप्रमुख डॉ. मीरा देसाई, एमआयटी आयएसबीजेचे संचालक डॉ. कृष्णमूर्ती ठाकूर, पुणे विद्यापीठ पत्रकारिता विभागप्रमुख डॉ. संजय तांबट, पुणे विद्यापीठ मीडिया स्टडीजच्या प्रमुख डॉ. माधवी रेड्डी, युनिसेफचे राज्यातील संवादतज्ज्ञ तानाजी पाटील, माजी विभागप्रमुख डॉ. रत्नाकर पंडित, डॉ. शिवाजी जाधव, डॉ. सुमेधा साळुंखे, ज्येष्ठ पत्रकार दशरथ पारेकर, गोविंद गोडबोले आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 OCT 2017
Times of India

# 122 colleges yet to get accreditation

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Shivaji University, Kolhapur (SUK) will conduct orientation workshops for its affiliated colleges in October and November, to make more colleges comply with National Assessment and Accreditation Council's (NAAC) re-accreditation process.

According to D T Shirke, pro-vice-chancellor of SUK, there are around 122 colleges which are yet to comply with the norms. Most of these colleges are not aided.

Every educational institution needs to evaluate itself through NAAC's five yearly re-accreditation process to keep itself updated in terms of academic and administrative performance.

Shirke told **TOI**, "According to our report, there are still 122 colleges which need to go through NAAC assessment. Since most of them are un-aided we will be conducting a workshop with the help of NAAC authorities to let the colleges know how the system works. There have been recent changes in the NAAC. Hence, this workshop will play a vital role.

He added that NAAC accreditation is mandatory and if colleges don't apply now, they might lose the benefits that central or state government has to offer.

There are various funds from University Grants Commission (UGC) and Rashtriya Uchchatar Shiksha Abhiyan (RUSA) which can be availed only if an institute has NAAC assessment.

Shirke said that colleges have reacted positively at the news of the workshop and it is likely that the number of assessment cycle may rise in the division in the coming days.

He also said that the colleges which are regular in their assessment cycle will have a separate workshop.

> According to our report, there are still 122 colleges which need to go through NAAC assessment. Since most of them are unaided we will be conducting a workshop with the help of NAAC authorities to let the colleges know how the system works
>
> **D T Shirke** | SUK PRO V-C

**ORIENTATION WORKSHOPS**

14 OCT 2017

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पावसातही वापरा आता कोल्हापुरी चप्पल

## दिग्विजय पाटील यांचे संशोधन; 'पेटंट'ही मिळणार; रासायनिक प्रयोगाचे फलित

प्रतिनिधी
कोल्हापूर

कोल्हापूरला येणाऱ्या पर्यटकाने जाताना कोल्हापुरी चप्पल खरेदी नाही केले तरच नवल! या चपलांची अपूर्वाई आता अवघ्या देशभरात पसरली आहे. पण असे असले तरी कोणालाही भुरळ पाडणारे हे 'मर्दानी पायताण' पावसाळा आला की प्लास्टिकच्या पिशवीत गुंडाळून ठेवावे लागते. हा मायनस पॉइंट हेरून येथील एका युवकाने यावर संशोधन केले आणि भर पावसातही 'कुरकूर' न करणारे कोल्हापुरी चप्पल अस्तित्वात आणले. हे भन्नाट संशोधन केले आहे पन्हाळा तालुक्यातील दिग्विजय पाटील यांनी.



पत्रकार परिषदेत या बाबतची माहिती देताना दिग्विजय पाटील म्हणाले, "कोल्हापुरी चप्पल' हा लोकप्रिय ब्रँड असून याला परदेशातही मोठी मागणी आहे; परंतु पावसाळ्यामध्ये पाऊस व दमट हवेमुळे हे चप्पल पांढरे व मऊ पडत असल्यामुळे यावर संशोधन करून पाण्याचा कोणताही दुष्परिणाम या चप्पलवर होणार नाही, अशा प्रकारचे रसायन शोधून काढण्यात आले आहे."

दिग्विजय पाटील हे पन्हाळा तालुक्यातील कोडोली येथील असून, शिवाजी विद्यापीठाच्या नॅनो सायन्स ॲन्ड टेक्नॉलॉजीचे ते विद्यार्थी आहेत. या संशोधनाची माहिती देताना ते पुढे म्हणाले, "कोल्हापुरी चपलाला मोठी मागणी आहे; पण बनावट कोल्हापुरी चप्पलही आज बाजारात उपलब्ध असून याचे लेदरही हलक्या प्रतीचे असते. पावसाळ्यात हे चप्पल बुरशी पकडून मऊ पडते. यावर गेल्या तीन वर्षांपासून संशोधन करण्यात आले असून या प्रयत्नांना यशही मिळाले आहे. या संशोधनानुसार असे कोल्हापुरी चप्पल पाण्यात, पावसात वापरता येणार आहे."

अनेक रासायनिक प्रयोग करून हे रसायन तयार केले आहे. हे रसायन कोल्हापुरी चपलावर लावल्यास पाणी, चिखल, आम्ल व तेलाचा परिणाम होणार नाही.

या संशोधनाच्या स्वामित्वासाठी भारत सरकारच्या पेटंट विभागाकडे अर्ज करण्यात आला आहे. 'पेटंट' बहाल करण्याविषयीच्या नियमावलीनुसार एखाद्या शहराच्या नावावरून पेटंट मिळू शकत नाही. यामुळे या संशोधनाचे नाव 'सुपरहायड्रोफोबिक लेदर फुटवेअर' असे ठेवण्यात आले आहे. यामध्ये कोल्हापुरी चप्पल, लेदर बूट, लेदर चप्पल यांचा समावेश आहे. या सर्व घटकांचा अभ्यास करून दिग्विजय पाटील यांनी परिश्रमपूर्वक पावसातही रुबाबात चालू शकणाऱ्या कोल्हापुरी चपलावर संशोधन केले आहे. या संशोधनाच्या स्वामित्वासाठी (पेटंट) कायदेशीर कागदपत्रांची पूर्तता झाल्याचेही पाटील यांनी सांगितले. पत्रकार परिषदेस प्रा. डॉ. उर्मिला पाटील, आर. आर. पाटील उपस्थित होते..

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 OCT 2017
लोकमत

# लेदरचे चप्पल पावसाळ्यातही वापरा

## कोडोलीच्या दिग्विजय पाटील यांचे संशोधन : पेटंटसाठी प्रयत्नशील

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** लेदरचे चप्पल पावसाळ्यात बुरशी पकडते व चप्पल पांढरे पडून मऊ पडतात. त्यावर संशोधन करुन एक रसायन शोधले असून त्याचा वापर केल्यास पाणी, चिखल, कोणत्याही आम्लाचा परिणाम होत नाही. परिणामी, हे लेदरचे चप्पल आता बाराही महिने वापरता येऊ शकते, अशी माहिती दिग्विजय राजेश पाटील (कोडोली, ता. पन्हाळा) यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत दिली.

लेदरची चप्पल ही कोल्हापूरची खास ओळख आहे; पण अलीकडे निकृष्ट दर्जाचे लेदर व इतर जिल्ह्यांतील कारागीरांनी केलेल्या घुसखोरीमुळे हे नाव बदनाम झाले आहे. त्याचा दर्जा टिकावा व 'कोल्हापुरी चप्पल' बारा महिने वापरता यावे यासाठी गेल्या दीड वर्षापासून संशोधन केले. लेदर पाणी, चिखल, आम्ल, तेलाच्या वापरामुळे खराब होते. त्याला बुरशी येऊन चमडे कुजते. चमड्यावर पाणी पडले तरी ते लगेच निघून जावे, असे रसायन शोधले आहे. चप्पल कापडाने पुसून त्यावर हे रसायन लावले. त्यानंतर तीस मिनिटे वाळविल्यानंतर दुसरा थर लावला जातो. सिल्व्हर रंगाचे हे रसायन असून याचा वापर लेदर शूजसाठी केला जातो. त्याचे पेटंट मिळविण्यासाठी केंद्र सरकारच्या पातळीवर प्रयत्न केले असून, लवकरच त्याला मान्यता मिळणार असल्याचे दिग्विजय पाटील यांनी सांगितले. यावेळी राजेश पाटील, प्रा. डॉ. उर्मिला पाटील आदी उपस्थित होते..

### दिग्विजय 'नॅनो सायन्स'चा विद्यार्थी

दिग्विजय पाटील हा शिवाजी विद्यापीठात बी. एस्सी नॅनो सायन्स अँन्ड टेक्नॉलॉजीच्या दुसऱ्या वर्षात शिक्षण घेत आहे.



जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 OCT 2017
तरुण भारत

# विद्यापीठात 'अन्न प्रक्रिया व्यवसाय' विषयावर चर्चासत्र

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी, फूड टेक्नॉलॉजी आणि सीआयआय यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार १६ रोजी 'वर्ल्ड फूड डे" च्या निमित्ताने राजर्षी शाहू सभागृहात विशेष चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. 'अन्न प्रक्रियेतील व्यवसायाच्या संधी" या विषयावर हे चर्चासत्र होणार आहे.

या कार्यक्रमाला प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, तंत्रज्ञान अधिविभागाचे डॉ. जयदीप बागी यांची प्रमुख उपस्थिती राहील. हा कार्यक्रम १६ रोजी सकाळी दहा ते सायंकाळी ५ यावेळेत होणार आहे. कार्यक्रमासाठी सीआयआयचे दक्षिण महाराष्ट्र विभागाचे व्यवस्थापकीय संचालक योगेश कुलकर्णी, फूड सेफ्टी स्टँडर्ड ऍक्टचे डेप्युटी डायरेक्टर डॉ. के. यु. मेठेकर, सातारा फूड पार्कचे विजयकुमार चोले, हॉटेल हिलटॉपच्या पल्लवी कोरगावकर, मनीष अंतवाल, वारणा डेअरीचे कुलदिप नागलकर, समेधा थोंड, अन्न व औषध प्रशासनाचे सहाय्यक आयुक्त मोहन केंबळकर, अन्न तंत्रज्ञानचे विभागप्रमुख डॉ. अक्षयकुमार साहू, हे मान्यवर नवीन उत्पादनांची निर्मिती व फूड प्रोसेसिंगमधील संधी या विषयावर मार्गदर्शन करतील. तर एसआयडीबीआयचे असिस्टंट जनरल मॅनेजर भगवान चांदनांनी हे उद्योग उभारणीसाठी मिळणाऱ्या विविध सवलतींवर मार्गदर्शन करतील.